MHTH250087172022

दाखल तारीख : १९/११/२०२२
नोंदणी तारीख : १९/११/२०२२
निकाल तारीखः २८/०५/२०२६
कालावधी : ०३ व. ०६ म. ०९ दि

**वसई येथील अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी, वसई, ता. वसई, जि. पालघर.**

**(पीठासीन न्यायाधीश: सुनिल बा.वाळके)**

**:: न्या य नि र्ण य ::**

**(पारित दिनांक २८/०५/२०२६)**

**नियमित फौजदारी खटला क्र.२९४०/२०२२** **निशाणी क्र.४१.**

(अपराध क्र.८४८/२०२२, वालीव पोलिस ठाणे)

| | |
|---|---|
| **अभियोगपक्ष** | महाराष्ट्र सरकार, पोलिस निरिक्षक,<br>वालीव पोलीस ठाणे,<br>ता.वसई, जि.पालघर. |
| श्री.यु.एस.बेलेकर, प्रभारी विद्वान सहा.अभियोक्ता | |
| **आरोपी क्र.०१** | केंटाईन जॉन परेरा<br>वय – ५२ वर्षे,<br>रा. जॉन परेरा हाऊस, गोखिवरे नाका,<br>वसई पुर्व, ता. वसई, जि. पालघर |
| **आरोपी क्र. ०२** | इगनेस उर्फ बाबू डॉमनीस घोन्सालविस<br>वय – ५२ वर्षे,<br>रा. झापावाडी, गोखिवरे,<br>वसई पुर्व, ता. वसई, जि. पालघर |
| श्री. निशाद पाटील, विद्वान अधिवक्ता. | |

| | |
|---|---|
| गुन्हा दिनांक – | ०७/०१/२०२२ |
| गुन्हा दाखल दिनांक – | २३/०८/२०२२ |
| दोषारोपपत्र दाखल दिनांक – | १९/११/२०२२ |
| दोषारोप निश्चित केल्याचा दिनांक – | २७/०४/२०२६ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक – | २५/०५/२०२६ |
| न्यायनिर्णय राखून ठेवल्याचा दिनांक – | – |
| न्यायनिर्णय पारीत दिनांक – | २८/०५/२०२६ |
| शिक्षा सुनावली असल्यास दिनांक – | – |

:: **<u>आरोपीचा तपशील</u>** ::

| आ. क्र. | आरोपींची नांवे | अटक दि. | जामिन वर मुक्त केल्याचा दि. | दोषारोप | निर्दोष / शिक्षा | शिक्षा | फौ.प्र.सं.क .४२८ साठी आरोपी कैदेत असल्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | केंटाईन जॉन परेरा | – | ०४.०१. २०२३ | भा.दं.वि. भा.दं. वि. संहितेचे कलम ३५४(अ) व ५०६ सह कलम ३४ | निर्दोष | – | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०२ | इगनेस उर्फ बाबू डॉमनीस घोन्सालविस | – | ०४.०१. २०२३ | वरीलप्रमाणे | निर्दोष | – | – |

०१. आरोपी भारतीय दंड विधान कलम ३५४, ३५४(ब) व ५०६ सह कलम ३४ अन्वये अभियोगीत आहे.

<u>**अभियोगपक्षाचे थोडक्यात कथन खालीलप्रमाणे**</u> :–

०२. दिनांक २३.०८.२०२२ रोजी फिर्यादी रोवेना रायन घोन्सालविस यांनी वालीव पोलीस ठाणे येथे फिर्याद दिली की, दि.०७.०१.२०२२ रोजी रात्री १०.३० वाजेच्या सुमारास मेरीर्यान बंगलो, गोखिवरे, वसई पुर्व ता. वसई येथे किरकोळ कारणावरून वाद होऊन आरोपींनी त्यांना मिठी मारून खाली पाडून, त्यांची छाती दाबली तसेच त्यांची आत्या नँटी डेमेलो यांच्या खांद्यावरील कपडे खाली खेचून त्यांचे मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केले. म्हणुन, सदरची फिर्याद दिली.

०३. फिर्यादवरुन वालीव पोलीस ठाणे यांनी गु.र.क्र.८४८/२०२२ भारतीय दंड संहिता कलम ३५४, ३५४(ब) व ५०६ सह कलम ३४ अन्वये गुन्हा नोंदविला. तपासी अंमलदार यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदविले व तपासाअंती आरोपीं विरुध्द अंतिम अहवाल न्यायालयात दाखल केला.

०४. आरोपी न्यायालयात हजर झाल्यानंतर आरोपींविरूध्द नि.३१ अन्वये भारतीय दंड संहिता कलम ३५४(अ) व ५०६ सह कलम ३४ अन्वये दोषारोप निश्चित केले. सदर दोषारोप आरोपींना त्यांच्या भाषेत समजावुन सांगितले. आरोपींनी गुन्हा कबूल केला नाही, त्यामुळे त्यांचे विरुध्द खटला चालविण्यात आला.

०५. खटला प्रलंबीत असताना फिर्यादी व आरोपींमध्ये आपसांत समझोता झाल्याने त्यांनी नि.क्र.३६ व ३७ अन्वये अर्ज व निर्देशिका सादर केली. भारतीय दंड विधान कलम ५०६ हा अपराध फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३२० अन्वये समझौतापात्र असल्याने खटला भारतीय दंड विधान कलम ३५४(अ) अन्वये पुढे चालविण्यात आला.

०६. अभियोगपक्षाने खटला शाबीत करण्यासाठी दोन साक्षीदारांची साक्ष दप्तरी नोंदविली. अभियोगपक्षाने नि.क्र.४० वरील निर्देशिके अन्वये पुरावा बंद केला. अभियोगपक्षाच्या पूराव्यात आरोपींविरुध्द आक्षेपार्ह विधाने न आल्याने आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वये निवेदन नोंदविण्यात आले नाही.

०७. अभियोगपक्षाचा पुर्ण पुरावा पाहता खालील मुद्दे या न्यायालयासमोर निष्कर्षासाठी उपस्थित झाले आहे. त्यावर कारणमिमांसेसह उत्तर खालील प्रमाणे

दिले आहे :

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| ०१. | अभियोगपक्ष असे सिध्द करितो काय की, ०७.०१.२०२२ रोजी रात्री १०.३० वाजेचे सुमारास मेरीर्यान बंगलो, गोखिवरे, वसई पुर्व, ता. वसई, जि. पालघर येथे तुम्ही आरोपींनी समान हेतुने फिर्यादीची छाती दाबून व साक्षीदार नँटी यांच्या खांद्यावरील कपडे खेचून त्यांचा विनयभंग करण्याच्या उद्देशाने त्यांच्याकडून तसा विनयभंग होण्याचा संभव असल्याची त्यांना जाणीव असताना फौजदारीपात्र बलप्रयोग केला? | नकारार्थी. |
| ०२. | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

:: **का र ण मिं मा सा** ::

०८. आरोपींविरुध्द गुन्हा शाबित करण्याकरिता खालील पुरावा नोंदवला आहे.

| **मौखिक पुरावा** | | | |
|---|---|---|---|
| **सा.क्र.** | **नांव** | **पुराव्याचे स्वरुप** | **निशाणी** |
| सा.क्र.०१ | रोवेना रायन घोन्सालविस | फिर्यादी | नि.क्र.३८ |
| सा.क्र.०२ | नॅटी बर्नाड डिमेलो | साक्षीदार | नि.क्र.३९ |

०९. अभियोगपक्षातर्फे प्रभारी विद्वान अभियोक्ता श्री.यु.एस.बेलेकर व आरोपींतर्फे विद्वान अधिवक्ता श्री.निशाद पाटील, यांचा युक्तीवाद श्रवण केला.

**<u>मुद्दा क्र.०१</u> :–**

१०. आरोपींविरूध्द दोषारोप शाबीत करण्यासाठी अभियोगपक्षास आरोपींनी समान हेतुने फिर्यादीची छाती दाबून व साक्षीदार नँटी यांच्या खांद्यावरील कपडे खेचून त्यांचा विनयभंग करण्याच्या उद्देशाने त्यांच्याकडून तसा विनयभंग होण्याचा संभव असल्याची त्यांना जाणीव असताना फौजदारीपात्र बलप्रयोग केला, ही बाब संशयाच्या पलीकडे शाबीत करणे आवश्यक आहे.

११. दप्तरी आलेल्या पुराव्याचे विवेचन करण्यापुर्वी प्रथमत: अभियोगपक्षाच्या खटल्यानुसार घटना दि.०७.०१.२०२२ रोजी रात्री १०.३० वाजेच्या सुमारास घडली होती व घटनेबाबत प्रथम खबर दि.२३.०८.२०२२ रोजी दिल्याचे दिसून येते. परिणामी, फिर्याद देण्यास विलंब झाला आहे. परिणामी, अभियोगपक्षाने सदरचा विलंब संयुक्तिक कारणांनी स्पष्ट केला आहे किंवा नाही हे पाहणे आवश्यक आहे.

१२. विलंबाच्या अनुषंगाने फिर्यादीच्या पुराव्याचे अवलोकन केले असता, त्यांनी घटनेबाबत प्रथम खबर देण्यास झालेल्या विलंबाबाबत अवाक्षरही कथन केलेले नाही. अभियोगपक्षाने फिर्याद देण्यास झालेल्या विलंबाबात कोणतेही कारण

दप्तरी दिलेले नाही. त्यामुळे, सदरचा विलंब हा अभियोगपक्षाच्या खटल्यास बाधक आहे किंवा नाही, हे पाहणे आवश्यक आहे.

१३. सा.क्र.०१ फिर्यादी रोवेना यांनी त्यांच्या पुराव्यात असे कथन केले की, घटना अंदाजे चार ते पाच वर्षांपुर्वी घडली होती. परंतु, निश्चित काय घटना घडली हे त्यांना आठवत नाही. पोलीस ठाण्यात त्यांनी लेखी तक्रार दिली होती. त्यांनी फिर्यादीवर त्यांची सही असल्याचे मान्य केले. परंतु, त्यातील मजकुर त्यांना माहीत नसल्याचे कथन केले. साक्षीदाराने अभियोगपक्षाच्या कथनानुरुप कथने न केल्याने अभियोगपक्षास भारतीय पुरावा कायदा कलम १५४ अन्वये प्रश्न विचारण्याची परवानगी देवून देखील खटल्यास पुरक ठरेल असे कोणतेही विधान दप्तरी मिळून आले नाही.

१४. सा.क्र.०२ नॅटी ह्या फिर्यादीच्या आत्या असून त्यांनी त्यांच्या पुराव्यात असे कथन केले की, घटना काय, कधी व कोठे घडली हे त्यांना आठवत नाही. त्यांच्या बाबतीत कधीही कोणतीही घटना घडली नव्हती. पोलीसांनी घटनेबाबत चौकशी केली नव्हती. साक्षीदाराने अभियोगपक्षाच्या कथनानुरुप कथने न केल्याने अभियोगपक्षास भारतीय पुरावा कायदा कलम १५४ अन्वये प्रश्न विचारण्याची परवानगी देवून देखील खटल्यास पुरक ठरेल असे कोणतेही विधान दप्तरी मिळून आले नाही.

१५. उपरोक्त साक्षीदारांच्या पुराव्याचे अवलोकन केले असता त्यांनी आरोपींच्या तथाकथित कृत्यांबाबत अवाक्षरही सांगितलेले नाही. उलटपक्षी, त्यांनी अभियोगपक्षातर्फे देण्यात आलेल्या सुचना स्पष्टपणे फेटाळल्या आहेत. खटल्यातील मुख्य साक्षीदारांनीच अभियोगपक्षाच्या खटल्यानुरूप कथने न केल्यामुळे कदाचित अभियोगपक्षाने दप्तरी इतर साक्षीदार तपासलेले नाहीत. परिणामी, आरोपींना घटनेशी जोडणारा कोणताही पुरावा दप्तरी उपलब्ध नाही.

१६. जरी कायद्याची अशी स्थिर परिस्थिती आहे की, एका साक्षीदाराचा पुरावा हा देखील आरोपीस शिक्षा देण्यास पुरेसा असतो. परंतु, त्यासाठी सदर साक्षीदाराचा पुरावा हा सत्यतेच्या कसोटी पूर्ण करणारा असावा लागतो. परंतु, वर नमुद केल्याप्रमाणे साक्षीदारांचा पुरावा सदरची कसोटी पूर्ण करण्यास अपुरा आहे. तसेच, घटनेबाबत प्रथम खबर देण्यास झालेला विलंब देखील अभियोगपक्षाच्या खटल्यास बाधक आहे. एकंदरीत अभियोगपक्षाने अपराधाची मुलतत्तवे दप्तरी शाबित केलेली नाहीत. परिणामी, मुद्दा क्र.०१ चे उत्तर नकारार्थी देण्यात येत आहे.

**मुद्दा क्र.०२**:–

१७. अभियोगपक्षाने आरोपींच्या विरोधात जो काही तोंडी पुरावा दिलेला आहे, तो पुरावा अतिशय तोकडा, अपुरा व संशयास्पद आहे. उपरोक्त मुद्दा क्र.०१

च्या विश्लेषणानुसार अभियोगपक्षाला आरोपींविरुध्द खटला संशयांच्या पलीकडे शाबीत करण्यास अपयश आलेले आहे. फौजदारी प्रणालीनुसार संशयाचा फायदा हा नेहमीच आरोपींच्या लाभात जातो. संशयाचा फायदा आरोपींना देऊन खालीलप्रमाणे अंतिम आदेश पारीत करण्यात येत आहे.

**:: <u>आ दे श</u> ::**

**०१.** आरोपी क्र.०१ केंटाईन जॉन परेरा व क्र.०२ इगनेस उर्फ बाबू डॉमनीस घोन्सालविस, यांची भारतीय दंड विधान कलम ३५४(अ) सह कलम ३४ या गुन्ह्यातुन फौजदारी प्रक्रिया संहिता, कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यांत येत आहे.

०२. आरोपींची भारतीय दंड विधान कलम ५०६ सह कलम ३४ या गुन्ह्यातुन फौजदारी प्रक्रिया संहिता, कलम ३२० (८) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यांत येत आहे.

०३. आरोपींचे जामीन मुचलके फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७(अ) नुसार पुढील सहा महिन्यांच्या कालावधीकरीता पुढे कायम करण्यात येत आहे.

SUNIL BABASAHEB WALKE
Digitally signed by SUNIL BABASAHEB WALKE
Date: 2026.05.28 16:33:42 +0530

दिनांक –२८/०५/२०२६ (सुनिल बा. वाळके)

ठिकाण – वसई. अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,

वसई.